MHND100001622026

# (निशाणी १ वरील आदेश )

(दिनांक ०६ माहे एप्रिल, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र. २ ते ६ यांची आई असून अर्जदार क्र.२ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ व बहिण आहेत. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडील दिगंबर पि.ग्यानोबा घोडके हे दिनांक १६.०४.२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांव्यतिरिक्त मयत दिगंबर पि.ग्यानोबा घोडके यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४. अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत दिगंबर पि.ग्यानोबा घोडके यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १४), वारसा प्रमाणपत्र (निशाणी २१), अर्जदार क्र.१ ते ६ यांचे पडताळणी केलेले आधारकार्डच्या प्रती (निशाणी १५ ते २०) व दि.१९.०२.२०२६ रोजीचे 'श्रमिक एकजूट' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी २२) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५.	अर्जदार क्र.१ भामाबाई भ्र. दिगंबर घोडके यांनी त्यांचा पुरावा शपथपत्र (निशाणी ११) अभिलेखावर दाखल केले असून सदरचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'श्रमिक एकजूट' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी २२) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली, परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब, अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र. २ ते ६ हे मुले या नात्याने मयत दिगंबर पि.ग्यानोबा घोडके यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्रमांक १. भामाबाई भ्र. दिगंबर घोडके, २. रोहिदास दिगांबर घोडके, ३.बाळू दिगांबर घोडके, ४. शिवमाला भ्र. बापूराव गोपे, ५. शकुंतला भ्र. पांडुरंग लेंडाळे व आरोपी क्र.६ शिवराणी मलीकार्जुन टेळके हे मयत दिगंबर पि.ग्यानोबा घोडके यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.04.06 17:04:15 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.०६.०४.२०२६

# Certificate

I affirm that the contents of this P. D.F file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Mrs J P Ghogare |
| Court Name | :- | In the Court of Jt.C.J.J.D., Kandhar |
| Date of the Order/Judgment | :- | 06.04.2026 |
| Order/Judgment signed by the Presiding officer on | :- | 06.04.2026 |
| Order/Judgment uploaded on | :- | 06.04.2026 |